**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक १० मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **वंचितांचं आरक्षण टिकवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचा भाजपाचे ज्येष्ठनेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून नंदुरबारमधल्या सभेत पुनरुच्चार.**
2. **अंधश्रद्धा निर्मुलन क्षेत्राचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या दोषींना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं दिली जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा.**
3. **दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून कथित मद्यधोरण प्रकरणात १ जून पर्यंत अंतरिम जामीन मंजूर.**
4. **अक्षय्य तृतीयेसह, परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी.**
5. **नागपूरच्या नाग, पिवळी आणि पोहरा नदी स्वच्छतेसह, घाट रोडवरील नाग नदी रुंदीकरणाचे काम सुरू.**

*****

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी - सभा

वंचित वर्गाच्या आरक्षणाच्या रक्षणासाठी सदैव कार्यरत राहणार आहे. ST, SC आणि ओबीसींच आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नंदुरबारमधल्या प्रचारसभेत केला. महाविकास आघाडी SC, ST आणि OBC चे आरक्षण हटवण्यासाठी कार्यरत आहे. आरक्षण वाचवण्याचं आश्वासन आपण गेले कित्येक दिवस देत असून काँग्रेस या मुद्द्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचा दावा त्यांनी केला. आदिवासींच्या विरोधामुळं काँग्रेसनं राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांना विरोध केल्याचं ते म्हणाले. राम मंदिराच्या मुद्द्यांवरुन काँग्रेसनं घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी टीका केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी-प्रतिक्रिया

नंदुरबारच्या भाजपा उमेदवार डॉ.हिना गावित यांच्या प्रचारार्थ आज त्यांची सभा झाली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती होती. दरम्यान उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत

दिलं. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात यासंदर्भातलं वक्तव्य शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्यासंदर्भातून पंतप्रधान मोदी बोलत होते. शरद पवार यांनी मात्र मोदी यांचा प्रस्ताव फेटाळला आहे. नरेंद्र मोदी यांची अलिकडची सगळी भाषणं समाजात गैरविश्वास निर्माण व्हायला पोषक आणि देशाच्या दृष्टीने घातक आहेत. जे देशाच्या हिताचे नाहीत ते आमचे सहकारी असणार नाहीत, असं शरद पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले. गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर आमचा पक्ष चालतो. समाजातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवून आम्ही काम करतो, त्यामुळं अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही, असं ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर भारतीय जनता पक्ष १५०, जागाही जिंकू शकत नाही हे स्पष्ट झाले आहे. पराभवाच्या चिंतेतून नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांना एनडीएमध्ये सहभागी होण्याची जाहीर ऑफर दिली आहे, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. भाजपाने लोकसभा निवडणुकीत सर्व प्रकारची कार्ड वापरली पण कोणतेच कार्ड चालले नाही, हिंदु-मुस्लीम कार्डही फेल गेलं, त्यामुळे नरेंद्र मोदी यांना दररोज नवे कार्ड वापरावे लागत आहे, असा आरोप त्यांनी केला.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण भिवंडी आणि कल्याण लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

डॉ.नरेंद्र दाभोलकर

अंधश्रद्धा निर्मुलन क्षेत्रात कार्यरत ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी त्यांच्यावर गोळीबार करणाऱ्या सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या दोघांनी गोळी झाडल्याची कबुली दिली होती. तर पुराव्या अभावी डॉ. विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची मुक्तता केली आहे. याप्रकरणात UAPA अंतर्गत लावलेले आरोपही न्यायालयानं फेटाळले. दोषी असलेल्या दोघांना शिक्षा देण्याच्या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचं दाभोलकर यांची कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात सकाळी दाभोळकर यांची हत्या झाली होती.

महावितरण

महावितरणने राज्यातल्या तीन कोटी वीजग्राहकांसाठी घरबसल्या एका क्लिकवर सर्व सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून वीजग्राहकांच्या संवादपर मदतीसाठी, ऊर्जा चॅट बॉट, महावितरणच्या संकेतस्थळ आणि मोबाईल ऍपवर उपलब्ध करून देण्यात आलं आहे. नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून या सेवेचा ग्राहकांना लाभ घेता येईल.

अरविंद केजरीवाल

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून कथित मद्यधोरण प्रकरणात १ जून पर्यंत अंतरिम जामीन मंजूर झाला आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंजपीठानं आज हा निर्णय दिला. लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं मुभा दिली असून २ जून रोजी त्यांना आत्मसमर्पण करावं लागेल. ईडीने काल सर्वोच्च न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र दाखल करून केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्यासाठी विरोध केला होता. केजरीवाल यांना २१ मार्च रोजी ईडीनं अटक केली होती. तेव्हांपासून ते तिहार तुरुंगात आहेत.

रक्तपेढी

हेडगेवार रक्त केंद्र गेल्या ३१ वर्षांपासून थॅलेसेमिया आणि सिकलसेल रुग्णांची सेवा करत आहे. रक्तपेढीच्या ३२ व्या स्थापना दिनी नागपुरातील शिवाजी नगर येथील हेडगेवार रक्त केंद्रात काल गामा इ रेडिएशन सुविधा केंद्राचे उद्घाटन करण्यात आलं. या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी, एम्स रुग्णालयाचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी, वेस्टर्न कोलफिल्डचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुप्ता, डॉ. विजयकुमार तुंगार, सचिव अशोक पत्की यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी हेडगेवार रक्त केंद्राचे सचिव अशोक पत्की म्हणाले की, या इरॅडिएशन प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या किरणोत्सर्गामुळे पांढऱ्या रक्त पेशी नष्ट होतात. रक्ताच्या कमतरतेमुळे आणि रक्त संक्रमणामुळे कोणालाही त्रास होऊ नये या नवीन सुविधा केन्द्रचा स्थापना दिनानिमित्त देतांना ते बोलत होते.हेडगेवार रक्त केंद्रांचा संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुप्ता या प्रसंगी म्हणालेत कि वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड इंडियाचा संपूर्ण आर्थिक पाठिंब्यामुळे ही सुविधा सुरु करणे शक्य झाहल्याचे ते म्हणाले. या सुविधा केन्द्रचा स्थापना दिनानिमित्त प्रामुख्याने उपस्थित भैय्याजी जोशी म्हणाले की या सुविधा केन्द्रचा लाभ गरजु रुग्णांना मिळणार आहे. भविष्यात थॅलेसेमिया आणि सिकलसेल रुग्णांची सेवे करिता इतर मदत करणयाचे आश्वासनं ही त्यांनी या प्रसंगी दिले.

## अक्षय्य तृतीया/महात्मा बसवेश्वर जयंती

वैशाख शुद्ध तृतीया अर्थात अक्षय्य तृतीयेचा सण आज साजरा होत आहे. साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभकार्याचं फळ अक्षय्य अर्थात न संपणारं असतं, अशी मान्यता आहे. अक्षय्य तृतीयेला सोन्या-चांदीच्या खरेदीला महत्त्व आहे. याकरता ठिकठिकाणच्या सराफा बाजारपेठा सजल्या असून आज मोठी उलाढाल होण्याची शक्यता आहे. दरम्यान अक्षय्य तृतीयेनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील लोकांना शुभेच्छा दिल्या आहेत. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये, हा शुभ प्रसंग लोकांना परोपकारासाठी प्रोत्साहित करेल, प्रत्येकाच्या जीवनात नवीन ऊर्जा आणि उत्साह आणेल अशी आशा त्यांनी आपल्या संदेशात व्यक्त केली आहे. आज महात्मा बसवेश्वर जयंती आणि परशुराम जयंती देखील विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, नागपूर महावितरण काटोल मार्गवरील 'विद्युत भवन' कार्यालय,विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर महानगरपालिका या ठिकाणी महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. यवतमाळ मध्ये बसव जन्मोत्सवानिमित्त मोटरसायकल रॅली काढून महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन करण्यात आले. वीरशैव हितसंवर्धक मंडळ, वसुधा प्रतिष्ठान, बसव क्लब, लिंगायत महिला मंडळाच्या वतीने आज बसव जन्मोत्सव साजरा करण्यात येत आहे. महात्मा बसवेश्वर चौकातून निघालेल्या या मोटारसायकल रैलीत महिला, पुरुष पारंपरिक पोशाखात सहभागी झाले. परशुराम जयंती निमित्त विविध संस्था संघटनांतर्फे घरमिक कार्यक्रमांचं आयोजन, शोभायात्रा आणि प्रसाद वितरण यांचे आयोजन करण्यात आलं.

## बालविवाह

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह लावले जाण्याची दाट शक्यता लक्षात घेता बालविवाह होत असलेल्या आढळून आल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ ला तातकाळ माहिती देण्याचं आव्हान करण्यात आलं आहे.

## महिला क्रिकेट

महिला क्रिकेट मध्ये, बांग्लादेशाविरुद्धची टी- ट्वेंटी मालिका भारतानं पाच - शून्य अशी जिंकली आहे. काल बांग्लादेशात सिल्हट इथं झालेल्या पाचव्या सामन्यात भारतानं २१ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करत भारतीय संघानं पाच बाद १५६ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल बांग्लादेशचा संघ सहा बाद १३५ धावाच करु शकला.

## नुकसानीची पाहणी

भंडारा जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात आलेल्या अवकाळी पावसाने शेतमालाचे नुकसान झाले आहे.आज जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मोहाडी

आणि  तुमसर तालुक्यातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेत बांधावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी केली. जिल्ह्यात एक ते दहा मे पर्यंत झालेल्या वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे 4 हजार 373 शेतकऱ्यांचे 1 हजार ५२०  हेक्टर क्षेत्रातील उन्हाळी धान आणि व भाजीपाला पिकाचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

नदी स्वच्छता

नागपूर शहरातील नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदीच्या स्वच्छतेचे काम सुरू आहे. या अभियानामध्ये नाग नदीच्या अंबाझरी दहन घाट परिसरातील पात्राचे रुंदीकरण देखील केलं  जात आहे. नाग नदी स्वच्छता तसेच पात्राचे रुंदीकरण कार्य मान्सूनपूर्वी पूर्ण व्हावे यादृष्टी गती वाढविण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी दिले. डॉ.चौधरी यांनी नाग नदी स्वच्छता तसेच अंबाझरी दहन घाटाजवळील पात्राच्या रुंदीकरण कामाची पाहणी केली आणि आढावा घेतला. नाग नदीच्या पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होउ नये आणि खूप जास्त पावसातही पाणी सुरळीत वाहून जावे यासाठी अंबाझरी दहन घाट ते व्हीएनआयटी पूलापर्यंतचे पात्र रुंद करण्याची सूचना सिंचन विभागाद्वारे करण्यात आली होती.

हवामान

येत्या 12 मे पर्यन्त विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात हलक्या ते मध्यम पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागातर्फे जारी करण्यात आला. आगामी काही तासात विदर्भातील अमरावती, बुलढाणा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान गेल्या 24 तासात  विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 43 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस  नोंदविण्यात आलं.

*****